admn 25-26

MCAER
कृषि परिषद

**महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**
ई मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनीक्र.-०२०-२५५२८६८८
संकेतस्थळ-www.mcaer.org

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/ ६२६/१०६/३६४ दि.०६ फेब्रुवारी,२०२६

**परिपत्रक**

**विषयः-** **आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६**
**रिक्त जागा भरण्यासाठी कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी 'जागेवरील प्रवेश फेरी' राबविणेबाबत.**

सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षातील आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार दि. ११/१२/२०२५ ते २७/०१/२०२६ या कालावधीत तिसरी प्रवेश फेरी राबविण्यात आली. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयातील रिक्त जागांचा समावेश करूनच सदरची प्रवेश फेरी राबविण्यात आलेली आहे.

तथापि, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयातून प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारांनी प्रवेश घेतलेले नसल्याने जागा रिक्त होत आहेत. सदर रिक्त जागांवर प्रवेश मिळण्याविषयी पात्र उमेदवारांकडून मागणी होत आहे.

यास अनुसरून सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षातील आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, **दि.०९/०२/२०२६ ते दि. १२/०२/२०२६ या कालावधीत राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी खालील दिनांकास 'जागेवरील प्रवेश फेरी' राबविण्यात येणार आहे.**

| कृषी विद्यापीठाचे नाव | अतिरिक्त जागेवरील प्रवेश फेरीचा दिनांक |
|---|---|
| डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | दि. ०९/०२/२०२६ |
| महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहिल्यानगर | दि. १०/०२/२०२६ |
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | दि. ११/०२/२०२६ |
| डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | दि. १२/०२/२०२६ |

उक्त जागेवरील प्रवेश फेरीद्वारे भरावयाच्या जागांचा तपशील https://phd.agrimcaer.in हया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर प्रवेश फेरीपूर्वी नव्याने जागा रिक्त झाल्यास अशा रिक्त जागांचा जागेवरील प्रवेश फेरीमध्ये समावेशकरण्यात येईल.

सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षाच्या अंतिम गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या आचार्य पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार 'जागेवरील प्रवेश फेरी'करिता पात्र असतील. तसेच राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत सध्या प्रवेशित उमेदवारास जागेवरील प्रवेश फेरीमध्ये प्रविष्ठ व्हावयाचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा सध्याचा प्रवेश रद्द केल्यास त्यांना जागेवरील प्रवेश फेरीमध्ये प्रविष्ठ होता येईल. अशा पात्र उमेदवारांनी तसेच चारही कृषी विद्यापीठांतील प्रवेश प्रक्रियेशी संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांनी पुढील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) उमेदवाराने रिक्त जागांचा तपशील विचारात घ्यावा आणि ज्या कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात प्रवेश घेण्यास इच्छुक आहे, अशा कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी उमेदवाराने सकाळी ९.३० ते १२.०० या कालावधीत आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उपस्थित राहावे.

(२) कृषी विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सकाळी ९.३० ते १२.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करावी आणि सूचना फलकावर प्रसिध्द करावी.

(३) प्रथमतः बिंदुनामावलीतील बिंदुचा क्रम व त्यानुसार उपलब्ध जागा विचारात घेऊन संबंधित प्रवर्गातील गुणवत्तेप्रमाणे प्रवेश देण्यात यावेत. यानंतर बिंदुचा क्रम नसलेल्या रूपांतरीत (CR,CO) जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावेत.

(४) संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्धनसल्यास, शासननिर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील रूपांतराच्या कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेशदेण्यात यावेत.

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **https://phd.agrimcaer.in** हया संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे संबंधित

उमेदवारास प्रवेश द्यावा. यासाठी संकेतस्थळावरील संबंधित कृषी विद्यापीठाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध असेल.

(६) उमेदवाराची योग्य ती कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क स्वीकारण्यासाठी प्रत्येक कृषी विद्यापीठाने योग्य ती व्यवस्था करावी.

(७) **या प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना कोणत्याहीप्रकारची शिष्यवृत्ती / शुल्काची प्रतिपूर्ती मिळणार नाही.**

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने.**

**(यशवंत साळे)**
**संचालक (शिक्षण)**

प्रत कार्यवाहीसाठी:-

१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३) मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रकाबाबत आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना, महाविद्यालयांना भ्रमणध्वनी / ई-मेल संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे. तसेच महाविद्यालयांच्या लॉगइनमध्ये तसेच संकेतस्थळावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.